कृषि प्रक्रिया सहकारी संस्था :

सन २०२६-२७ च्या मंजूर तरतूदीतून राष्ट्रीय सहकारी विकास निगम, नवी दिल्ली यांचेकडील कर्ज व व्याजाची परतफेड करण्यासाठी निधी वितरीत करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
शासन निर्णय क्र.प्रतिपू-६४२६/प्र.क्र.३९/१-स
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक:- २४ ऑगस्ट, २०२६.

वाचा :-

१) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र.प्रक्रिया-११२००४/प्र.क्र.१६२(अ)/९-स, दि.१२.१०.२००७.
२) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.०९.०४.२०२६.
३) NCDC मागणी पत्र क्र. NCDC: A&C/IX (१)/Rep/०९, दि.३.०८.२०२६.

प्रस्तावना :-

संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये राज्यातील शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या कृषीमालाला योग्य भाव मिळावा व स्थानिक पातळीवर रोजगार निर्मिती व्हावी या उद्देशाने राज्यातील कृषी प्रक्रिया सहकारी संस्थांना राष्ट्रीय सहकार विकास निगम (रा.स.वि.नि.) कडून अर्थसहाय्य (कर्ज व भागभांडवल) व राज्य शासनाचे भागभांडवल मंजूर करण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे. राष्ट्रीय सहकारी विकास निगममार्फत राज्य शासनास उपलब्ध करुन देण्यात येणारा निधी राज्य शासनावर संपूर्णपणे कर्ज म्हणून गणला जातो.

संदर्भ क्र. ३ येथील पत्रान्वये रा.स.वि.नि. ने शासनाकडे राज्यातील सहकारी कृषी प्रक्रिया संस्थांना शासन हमीवर रा.स.वि.नि. कडून यापूर्वी घेण्यात आलेल्या कर्ज व त्यावरील व्याजाची परतफेडीची दि.२०.०९.२०२६ रोजी देय असलेली रक्कम रु. ३८,५७,२२५/- आणि दि. २०.०९.२०२५ रोजी देय असलेल्या मागणीपोटी थकीत रक्कम रु. ८२७१/- अशी एकूण रक्कम रु. ३८,६५,४९६/- रक्कम अदा करण्याबाबत कळविले आहे.

सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात रा.स.वि.नि. कडील कर्जाच्या मुद्दलाची परतफेड करण्याच्या ६००३ ०४५८ या लेखाशिर्षाखाली रु.२,००,००,०००/- व कर्जाच्या मुद्दलावरील व्याजाच्या परतफेडीच्या २०४९ २७११ या लेखाशिर्षाखाली रू.२५,००,०००/- अशी एकूण रू. २,२५,००,०००/- इतकी **तरतूद अर्थसंकल्पित** आहे.

सदर तरतूदीमधून **सन २०२६-२७ या आर्थिक वर्षामध्ये** कर्जाच्या मुद्दलाची परतफेड अंतर्गत रु. ३२,२०,२०२/- व कर्जाच्या मुद्दलावरील व्याज अंतर्गत रु.६,४५,२९४/- अशी एकूण रु. ३८,६५,४९६/- इतकी रक्कम रा.स.वि.नि. ला अदा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

राज्यातील कृषी प्रक्रिया सहकारी संस्थांना राष्ट्रीय सहकार विकास निगम (रा.स.वि.नि.) कडून अर्थसहाय्य मंजूर करण्यात आले आहे. त्यानुषंगाने रा.स.वि.नि. कडील कर्जाच्या परतफेडीची रु. ३२,२०,२०२/- व कर्जाच्या मुद्दलावरील व्याज रु. ६,४५,२९४/- अशी एकूण रु. ३८,६५,४९६/- (अक्षरी रुपये अडतीस पासष्ट हजार सातशे चारशे शहान्नव फक्त) इतकी रक्कम राष्ट्रीय सहकारी विकास निगम ला अदा करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

सदर देयक हे "**बिनशर्त**" स्वरूपाचे आहे.

२. **सदर खर्च चालू आर्थिक वर्षात (सन २०२६-२७) खालील २ लेखाशिर्षांतर्गत मंजूर झालेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा -**

२.१) कर्ज- रु. ३२,२०,२०२/- (रूपये बत्तीस लाख वीस हजार दोनशे दोन फक्त)

मागणी क्रमांक व्ही-४ -

मुख्य लेखाशिर्ष
६००३, राज्य शासनाचे देशांतर्गत ऋण
(१०८), राष्ट्रीय सहकार विकास महामंडळाकडून मिळालेली कर्जे
(००) (०२) राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाकडून मिळालेली कर्जे (पणन) (अनिवार्य) भारित (६००३ ०४५८)
५६, कर्जाची परतफेड

२.२) व्याज- रु. ६,४५,२९४/- (रुपये सहा लाख पंचेचाळीस हजार दोनशे चौऱ्यान्नव फक्त)

मागणी क्रमांक व्ही-१

मुख्य लेखाशिर्ष
२०४९, व्याज प्रदाने
०१, देशांतर्गत ऋणावरील व्याज
२००, देशांतर्गत इतर ऋणावरील व्याज
(०२) कर्जावरील व्याज
(०२) (०७) राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाकडून मिळणाऱ्या कर्जावरील व्याज (पणन) (अनिवार्य) भारित (२०४९ २७११)
४५, व्याज

३. राष्ट्रीय सहकारी विकास निगम, नवी दिल्ली यांना मंजूर केलेली उपरोल्लिखित रक्कम अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई यांचेकडून आहरण करून राष्ट्रीय सहकारी विकास निगमाला त्यांचे वितरण करण्यासाठी कार्यासन अधिकारी, रोख शाखा, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग मंत्रालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी तसेच, सह सचिव (पणन), (V००१०) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. उपरोल्लेखित रक्कम RTGS सुविधेद्वारे राष्ट्रीय सहकारी विकास निगम, नवी दिल्ली यांना अदा करावयाची असून त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे:-

Name of the account	National Cooperative Development Corporation
Name of the Bank	State Bank of India
Name of the Branch	Commercial Branch, Nehru Place, Delhi
Account No.	32164052874
IFSC Code	SBIN0004298

५. राष्ट्रीय सहकारी विकास निगम, नवी दिल्ली यांनी सदर रक्कम प्राप्त झाल्याची पोच महाराष्ट्र शासनास नोंदणीकृत डाकेने/ई-मेलद्वारे मुद्रांकित पावती पाठवावी.

६. सदरचा शासन निर्णय वित्त विभाग/व्यय-२, अनौ.सं.क्र.५०४/२०२६ दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. संदर्भ क्र. ३ येथील वित्त विभाग, शासन परिपत्रक, दि.०९.०४.२०२६ मधील अटींची तसेच, त्यासोबतच्या परिशिष्टातील प्रस्तावाला लागू असलेल्या अटींची पूर्तता होत असल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६०८२४१२३७५९१३५६ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ASMITA RAVINDRA PATIL

Digitally signed by ASMITA RAVINDRA PATIL
DN: c=IN, 2.5.4.97=OFN:GOVERNMENT OF MAHARASHTRA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CMTD, 2.5.4.20=86C1E7844A91135F45E721934111CA2B5DC8481B51E96A79000AEEA1E91208FB, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=8E2CF7F99A7E33F6152BFF0B34255DD63550B37C8FBBB9A98CEE4ECD4336F598, cn=ASMITA RAVINDRA PATIL
Date: 2026.08.24 14:38:17 +05'30'

(अस्मिता पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) उप सचिव (अर्थसंकल्प/पणन), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) कार्यासन (१६ स, १७ स), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) कार्यासन अधिकारी (रोखशाखा) तथा आहरण व संवितरण अधिकारी, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) कक्ष अधिकारी (व्यय-२/ ऋण व हमी /अर्थ-१३), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
६) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
७) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
८) पणन संचालक, पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
९) सह संचालक, लेखा व कोषागारे (संगणक शाखा) , नविन प्रशासक भवन, ५ वा मजला, मंत्रालय, मुंबई.
१०) संचालक/ उप निदेशक (वित्त), राष्ट्रीय सहकार विकास निगम, ४ सिरी इन्स्टिट्यूशनल एरिया, हौजखास, नवी दिल्ली-११० ००१.
११) क्षेत्रीय संचालक, राष्ट्रीय सहकार विकास निगम, पुणे.
१२) निवडनस्ती, १-स.